**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN: 2581-6241
Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 5.146
Volume - 5, Issue - 11, November - 2022 Publication Date: 30/11/2022

DOIs:10.2018/SS/202211010 --:-- Research Article

# उच्च माध्यमिक स्तरीय कला शाखा आणि विज्ञान शाखा यांमधील विद्यार्थ्यांच्या जीवन, मानवता, देश व धर्म यांविषयीच्या अभिवृत्तींचा अभ्यास

**डॉ. प्रशांत काळे**
मार्गदर्शक
प्राध्यापक,
गोखले शिक्षणशास्त्र आणि संशोधन
महाविद्यालय, परेल, मुंबई

**मनिषा संतोष जाधव**
संशोधक
पी.एच.डी. विद्यार्थी
गोखले शिक्षणशास्त्र आणि संशोधन
महाविद्यालय, परेल, मुंबई

**सारांश :** विद्यार्थी हा शिक्षण प्रक्रियेतील अतिशय महत्त्वाचा घटक आहे. जो देशाचा भावी नागरिक आहे, देशाचा भवितव्याचा आधारस्तंभ बनणार आहे, त्याला घडविण्याचे, त्याच्या अभिवृत्ती योग्य दिशेकडे वळविण्याचे महान कार्य शिक्षकांना करावयाचे असते. या विद्यार्थ्यांना घडविताना त्यांच्यावर योग्य संस्कार, योग्य अभिवृत्ती यांची रुजवणूक करणे हे शिक्षकाचे कार्य आहे. शैक्षणिक प्रगतीबरोबरच विद्यार्थ्यांच्या जीवनाचा स्तर उंचावण्यासाठी, त्यांच्या विकासासाठी, त्यांच्या अभिवृत्ती जाणून घेण्यासाठी या संशोधनाची अतिशय गरज आहे.

प्रस्तुत संशोधनात कला शाखा आणि विज्ञान शाखा यांमधील उच्च माध्यमिक स्तरीय विद्यार्थ्यांच्या अभिवृत्तींच्या संदर्भात सद्यस्थितीचा अभ्यास करावयाचा असल्याने वर्णनात्मक संशोधन पध्दतीतील सर्वेक्षण पध्दतीचा उपयोग करण्यात आला. इयत्ता ११ वी HSC बोर्डाच्या एकूण २०० विद्यार्थ्यांची( १०० कला शाखेतील विद्यार्थी आणि १०० विज्ञान शाखेतील विद्यार्थी) निवड करण्यात आली. सदर संशोधनाकरिता टी.एस. सोधी यांनी विकसित केलेली अभिवृत्तीबाबतची 'Sodhi's Attitude Scale' चा उपयोग करण्यात आला. या संशोधनात विद्यार्थ्यांची जीवन, मानवता, देश व धर्म यांविषयीच्या अभिवृत्ती सकारात्मक दिसून आली तसेच मुला-मुलींच्या अभिवृत्तींमध्ये कोणताही लक्षणीय फरक दिसून आला नाही.

## 1. प्रस्तावना:

आज संपूर्ण जगाचे लक्ष भारताकडे आहे. भारत एक विकसित राष्ट्र बनण्याच्या मार्गावर आहे. विद्यार्थी ही देशाची खूप मोठी शक्ती आहे. प्रत्येक विद्यार्थी घडविताना त्यांच्यावर योग्य ते संस्कार झाले तर उद्याचा नागरिक सुजाण, सुसंस्कृत आणि राष्ट्रप्रेमी घडल्याशिवाय राहणार नाही. आपल्या कुटुंब, समाज, देश, धर्म यांविषयी त्यांच्या मनात प्रेम, आदर वाटला पाहिजे. स्वहितापेक्षा देश, समाज, धर्म यांचे हित महत्त्वाचे वाटले पाहिजे. त्यांच्या समृद्धीसाठी सतत सज्ज असायला पाहिजे.

खरंच जगाला, देशाला बदलायचे असेल तर या देशातील तरूणाला घडविणे गरजेचे आहे. इतिहासात देखील भगतसिंग, सावरकर, स्वामी विवेकानंद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विद्यार्थीदशेतच त्यांच्या मनात समाज, देश, धर्म यांविषयी असीम प्रेम, निष्ठा होती. त्यातूनच त्यांनी त्यायोगे शिक्षण घेतले. समाज, देश, धर्म यांसाठी काहीतरी करण्याची महत्त्वकांक्षा विद्यार्थीदशेतच त्यांच्यात निर्माण झाली होती. त्यांच्या अभिवृत्तीला योग्य मार्गदर्शन मिळाल्यामुळेच ते समाज, देश, धर्म घडवू शकले.

विदयार्थ्यांमध्ये धार्मिक, सामाजिक, राष्ट्रीय भावना सदोदित जागृत राहण्यासाठी शिक्षकांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे. भावी पिढी घडविणे, जागतिक नेतृत्व घडविणे, विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय, सामाजिक, धार्मिक मूल्ये रूजविणे, त्या अभिवृत्ती निर्माण करणे शिक्षकाची जबाबदारी आहे.

शिक्षणातून आदर्श नागरिक घडविता येतो. एक नागरिक म्हणून जीवन आणि मानवता, देश, धर्म यांविषयीच्या अभिवृत्तींची, कर्तव्यांची जाणीव विद्यार्थ्याला होणे आवश्यक आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांच्या या अभिवृत्तींचा अभ्यास करणे गरजेचे आहे. ब-याच वेळा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचे आयुष्यभर पुरून उरणारे घटक वा-यावर सोडून दिले जातात. विद्यार्थ्यांच्या या अभिवृत्तींकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. कारण १३ ते १९ हा विद्यार्थ्यांच्या कौमार्यावस्थेचा काळ आहे. मुलांच्या जीवनातील हा अतिशय महत्त्वाचा असा

कालखंड असतो. ज्याला वादळी अशांततेचा काळही म्हटले जाते. त्यात विकास प्रक्रियेला एकदम गती मिळून अनेक बदल घडतात. अनेक गोष्टींबद्दल गोडी वाटू लागते. कुमारांच्या अभिवृत्ती बदलत असतात, त्यांना निश्चित दिशा प्राप्त होऊ लागते. आपली शाळा, शिक्षक, देश, धर्म या बद्दल ही मुले चिकित्सक बनतात. आपण कोणता व्यवसाय करावा, कोणता अभ्यासक्रम निवडावा, कशात करिअर करावे यासंबंधी विचार ही मुले करू लागतात. हाच तो योग्य काळ असतो, जेव्हा मुलांमध्ये चांगले मूल्ये विकसित करू शकतो. म्हणूनच या वयात त्यांच्या अभिवृत्तींना योग्य दिशा, योग्य वळण देणे गरजेचे आहे.

विद्यार्थ्यांना समाजाभिमुख, देशाभिमुख करण्यासाठी अभ्यासासोबतच त्यांचे देश, मानवता, जीवन आणि धर्म यांच्या प्रती असणाऱ्या त्यांच्या भूमिका, जबाबदारीची, कर्तव्याची जाणीव करून देण्यासाठी मार्गदर्शन करणे, त्यांच्या अभिवृत्तींचा अभ्यास करणे गरजेचे आहे. त्यासाठीच या संशोधनाचा अभ्यास करण्याची गरज आहे.

**2. संशोधनाचे महत्त्व :**

ब-याच वेळा १० वी पर्यंत विद्यार्थ्यांच्या अभिवृत्तींकडे जितके लक्ष दिले जाते तितके पुढच्या वयोगटातील विद्यार्थ्यांकडे दिले जात नाही. म्हणूनच प्रस्तुत संशोधनातून उच्च माध्यमिक स्तरीय विद्यार्थ्यांच्या अभिवृत्ती अभ्यासून त्यांना योग्य दिशेने वळविण्यासाठीचे या संशोधनाचे प्रयोजन आहे. शिक्षण प्रक्रियेतून योग्य अभिवृत्ती निर्माण करून एक सुजाण, आदर्श, जबाबदार नागरिक घडवून देशाला प्रगतीपथावर नेण्यासाठी हे संशोधन उपयोगी ठरेल, आपला भारत सर्वच आघाड्यांवर श्रेष्ठ ठरेल. आज अनेक देशांच्या प्रगतीमध्ये युवकांचा सिंहाचा वाटा आहे. आपल्यालाही भारताला महासत्ता बनवायचे आहे. शाळा-महाविद्यालयातून शिक्षण घेऊन बाहेर पडणारा विद्यार्थी सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून समाज कामात सहभागी होत असेल, लोकांच्या सुख-दुःखाचे भान ठेवत असेल, समाजमूल्ये व नैतिक मूल्यांचे पालन करून रचनात्मक व विधायक कामासाठी स्वतः झोकून देत असेल, संस्कृती व सांस्कृतिक मूल्यांचा आदर करीत असेल, तसेच राष्ट्रीय एकात्मता, अखंडता, बंधुता, धर्मनिरपेक्षता तो पाळत असेल तर तो खरा त्याचा शिक्षणातून झालेला विकास होय. त्यासाठी विद्यार्थ्यांच्या या संदर्भातील अभिवृत्तींकडे लक्ष देणे महत्त्वाचे आहे. अगदी पहिल्या इयत्तेपासून ते महाविद्यालयीन शिक्षणापर्यंत या अभिवृत्तींकडे लक्ष देण्याची, त्यांचा अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. हे काम

शिक्षकच चांगल्याप्रकारे करू शकतात. शाळा व महाविद्यालयात याबाबतची जबाबदारी चोख व प्रामाणिकपणे पार पाडली तर आजचे विद्यार्थी या महान व विशाल देशाचे जबाबदार व उच्च दर्जाचे नागरिक बनतील. यासाठीच हे संशोधन महत्त्वाचे आहे.

**3. संशोधनाची उद्दिष्टे :**

१. उच्च माध्यमिक स्तरीय विद्यार्थ्यांच्या जीवन आणि मानवता विषयीच्या अभिवृत्तींचा अभ्यास करणे.
२.कला शाखा आणि विज्ञान शाखा यांमधील उच्च माध्यमिक स्तरीय विद्यार्थ्यांच्या जीवन आणि मानवता यांविषयीच्या अभिवृत्तींचा अभ्यास करणे.
३. उच्च माध्यमिक स्तरीय विद्यार्थ्यांच्या देशाविषयीच्या अभिवृत्तीचा अभ्यास करणे.
४.कला शाखा आणि विज्ञान शाखा यांमधील उच्च माध्यमिकस्तरीय विद्यार्थ्यांच्या देशाविषयीच्या अभिवृत्तीचा विषयीच्या अभिवृत्तींचा अभ्यास करणे.
५. उच्च माध्यमिक स्तरीय विद्यार्थ्यांच्या धर्माविषयीच्या अभिवृत्तींचा अभ्यास करणे.
६.कला शाखा आणि विज्ञान शाखा यांमधील उच्च माध्यमिक स्तरीय विद्यार्थ्यांच्या धर्माविषयीच्या अभिवृत्तींचा अभ्यास करणे.

**4. परिकल्पना:**

१. विद्यार्थ्यांच्या जीवन आणि मानवता विषयीच्या अभिवृत्तींमध्ये कोणताही लक्षणीय बदल दिसून आला नाही.
२. कला शाखा आणि विज्ञान शाखा यांमधील विद्यार्थ्यांच्या जीवन आणि मानवता यांविषयीच्या अभिवृत्तींमध्ये कोणताही लक्षणीय फरक दिसून येत नाही.
३. विद्यार्थ्यांच्या देशाविषयीच्या अभिवृत्तींमध्ये कोणताही लक्षणीय बदल दिसून येत नाही.
४. कला शाखा आणि विज्ञान शाखा यांमधील विद्यार्थ्यांच्या देशाविषयीच्या अभिवृत्तींमध्ये कोणताही लक्षणीय फरक दिसून येत नाही.
५. विद्यार्थ्यांच्या धर्माविषयीच्या अभिवृत्तींमध्ये कोणताही लक्षणीय बदल दिसून येत नाही.
६. कला शाखा आणि विज्ञान शाखा यांमधील विद्यार्थ्यांच्या धर्माविषयीच्या अभिवृत्तींमध्ये कोणताही लक्षणीय फरक दिसून येत नाही.

**5. संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा :**

१. प्रस्तुत संशोधनात ठाणे शहरातील उच्च माध्यमिक स्तरीय शाळेचा समावेश केला असून हे उच्च माध्यमिक स्तरीय शाळेपुरते मर्यादित आहे.
२. उच्च माध्यमिक स्तरातील फक्त ११ वी च्या विद्यार्थ्यांचा समावेश केला आहे. १२ वीच्या विद्यार्थ्यांचा समावेश केलेला नाही, ११ वी च्या विद्यार्थ्यांपुरते मर्यादित आहे.

३. प्रस्तुत संशोधन उच्च माध्यमिक स्तरीय विद्यार्थ्यांच्या जीवन आणि मानवता, देश तसेच धर्म या विषयीच्या अभिवृत्तींचा अभ्यास केला आहे.
४. प्रस्तुत संशोधन हे २०२१-२०२२ या वर्षात शिकणाऱ्या इयत्ता ११ वी च्या विद्यार्थ्यांचा समावेश केला असून हे संशोधन २०२१-२०२२ या वर्षात शिकणाऱ्या इयत्ता ११ वी च्या विद्यार्थ्यांपुरते मर्यादित आहे.
५. प्रस्तुत संशोधन हे २०२१-२०२२ या वर्षात शिकणाऱ्या इयत्ता ११ वी च्या कला शाखा आणि विज्ञान शाखा यांमधील विद्यार्थ्यांचा समावेश केला असून हे संशोधन २०२१-२०२२ या वर्षात शिकणाऱ्या इयत्ता ११ वी च्या विद्यार्थ्यांपुरते मर्यादित आहे.

**6. संशोधन समस्या :**
**"उच्च माध्यमिक स्तरीय कला शाखा आणि विज्ञान शाखा यांमधील विद्यार्थ्यांच्या जीवन, मानवता, देश व धर्म यांविषयीच्या अभिवृत्तींचा अभ्यास."**

**7. संशोधन नमुना :**
इयत्ता ११ वी HSC बोर्डाच्या एकूण २०० विद्यार्थ्यांची ( १०० कला शाखेतील विद्यार्थी आणि १०० विज्ञान शाखेतील विद्यार्थी) निवड करण्यात आली.

**8. संशोधन साधन:**
सदर संशोधनाकरिता टी.एस. सोधी यांनी विकसित केलेली अभिवृत्तीबाबतची 'Sodhi's Attitude Scale' चा उपयोग करण्यात येईल. या मापिकेमधील प्रश्नावलीमध्ये १.शिक्षक आणि पालक २. शिस्त ३. जीवन आणि मानवता ४. देश ५. धर्म असे ५ विभागांवर आधारित एकूण ७१ प्रश्न आहेत. त्यामध्ये जीवन आणि मानवता याविषयीच्या अभिवृत्ती मापनासाठी एकूण १९, देशाविषयीच्या अभिवृत्ती मापनासाठी एकूण १०, धर्माविषयीच्या अभिवृत्ती मापनासाठी एकूण २० असे एकूण ४९ प्रश्न आहेत.

**9. संशोधनाची पध्दती :**
प्रस्तुत संशोधनात उच्च माध्यमिक स्तरीय कला शाखा आणि विज्ञान शाखा यांमधील विद्यार्थ्यांच्या अभिवृत्तींच्या संदर्भात सद्यस्थितीचा अभ्यास करावयाचा असल्याने वर्णनात्मक संशोधन पध्दतीतील सर्वेक्षण पध्दतीचा उपयोग करण्यात आला.

**10. संशोधनाची कार्यवाही :**
प्रस्तुत संशोधनात उच्च माध्यमिक स्तरीय कला शाखा आणि विज्ञान शाखा यांमधील विद्यार्थ्यांच्या अभिवृत्तींच्या संदर्भात सद्यस्थितीचा अभ्यास करावयाचा असल्याने वर्णनात्मक संशोधन पध्दतीतील सर्वेक्षण पध्दतीचा उपयोग करण्यात आला. इयत्ता ११ वी HSC बोर्डाच्या एकूण २०० विद्यार्थ्यांची ( १०० कला शाखेतील विद्यार्थी आणि १०० विज्ञान शाखेतील विद्यार्थी) निवड करण्यात आली.
सदर संशोधनाकरिता टी.एस. सोधी यांनी विकसित केलेली अभिवृत्तीबाबतची 'Sodhi's Attitude Scale' चा उपयोग करण्यात आला आणि विद्यार्थ्यांची अभिवृत्ती मोजण्यात आली, त्यावरून निष्कर्ष काढण्यात आले.

**11. निष्कर्ष :**
प्रश्नावलीतील प्रश्नांच्या उत्तराव्दारा सर्व माहिती संकलित झाल्यानंतर मार्गदर्शक पुस्तिकेमध्ये दर्शविलेल्या प्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्याच्या गुणांची बेरीज स्कोअर सीटवर भरून, त्यानुसार सर्व विद्यार्थ्यांच्या प्रमाणित गुणांचा तक्ता तयार करण्यात आला. संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यासाठु मध्यमान, T परीक्षिका या संख्याशास्त्रीय तंत्राचा वापर करण्यात आला.

**तालिका**

| **चार अभिवृत्ती** | **लिंग** | **संख्या** | **मध्यमान** | **एस.डी.** | **टी. मूल्य** | **अभिवृत्तीचा स्तरातील फरक** |
|---|---|---|---|---|---|---|
| जीवन आणि मानवता | कला शाखेतील विद्यार्थी | १०० | २. ५२ | ३. ७६ | ०.७६ | लक्षणीय नाही |
| | विज्ञान शाखेतील विद्यार्थी | १०० | २. १० | ४. १३ | | |
| देश | कला शाखेतील विद्यार्थी | १०० | १०. ०३ | ३.७३ | १.६० | लक्षणीय नाही |
| | विज्ञान शाखेतील विद्यार्थी | १०० | ९.०२ | ५.२१ | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| धर्म | कला शाखेतील विद्यार्थी | १०० | ३. ०५ | ४.६५ | २.१० | लक्षणीय आहे |
| | विज्ञान शाखेतील विद्यार्थी | १०० | २. १४ | ३.९७ | | |

१. विद्यार्थ्यांची जीवन आणि मानवता यांविषयीच्या अभिवृत्ती सकारात्मक दिसून आली.
२.कला शाखा आणि विज्ञान शाखा यांमधील विद्यार्थ्यांच्या जीवन आणि मानवता यांविषयीच्या अभिवृत्तींमध्ये कोणताही लक्षणीय फरक दिसून येत नाही.
३. विद्यार्थ्यांची देशाविषयीची अभिवृत्ती सकारात्मक दिसून आली.
४. कला शाखा आणि विज्ञान शाखा यांमधील विद्यार्थ्यांच्या देशाविषयीच्या अभिवृत्तींमध्ये कोणताही लक्षणीय फरक दिसून येत नाही.
५. विद्यार्थ्याची धर्माविषयीची अभिवृत्ती सकारात्मक दिसून आली.
६. कला शाखेतील विद्यार्थ्यांची धर्माविषयीच्या अभिवृत्ती ही विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या अभिवृत्तीपेक्षा सकारात्मक दिसून आली.

**संदर्भग्रंथ सूची :**


१. दांडेकर वा.ना. (१९९६), शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र, श्रीविद्याप्रकाशन, पुणे.
२. करंदीकर सुरेश (२००१), शैक्षणिक मानसशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
३. कुंडले म.बा.(१९८४), शैक्षणिक तत्त्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र, श्रीविद्याप्रकाशन, पुणे.
४. मुळे रा. व उमाठे, वि. (१९७७), शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे (प्रथमावृत्ती), नागपूर:साहित्यप्रसार केंद्र
५. पंडित ब. बि. (१९९७) शिक्षणातील संशोधन अभिकल्प, (द्वितीयावृत्ती), नूतन प्रकाशन, पुणे.
६. करंदीकर सुरेश(२००१), शैक्षणिक मानसशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
७. Metha, R.S. 2003. Attitudes of College Students towards certain problems. Applied Journal of Educational Research Studies.
८. Garat, H. (1973). Statistics in Psychology and Education, Mumbai.
९. Best J.W. (1989) Research in Education, New Delhi: Prientis Hall of India.
१०. Shah. L.H. 2007. An investigation to study the problem of discipline in relation to pupil attitudes in secondary schools.
११. http://adalyajournal.com/
१२. http://shodhganga.inflibnet.ac.in:8080/jspui/handle/10603/223533